बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.

Approved by A. I. C. T. E. New Delhi
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. ९६३ **नोटीस** दि.०३/०९/२०२१

दि. ३०/०९/२०२१ पूर्वी स्कॉलरशिप/फ्रिशीप/ईबीसी/अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/अपंग शिष्यवृत्ती, निर्वाहभत्ता योजना २०२०-२१ इ. योजनाचे महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज करण्यास जाहीर झालेल्या मुदतवाढीबाबत.

(सदर नोटीस शासनस्तरावर २०२०-२१ करिताचे अर्ज मंजूर झाले आहेत त्यांना लागू राहणार नाही.)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शासनाने मागील काही दिवसांपासून महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्ती/फ्रिशीप/ईबीसी सवलत/ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/विविध निर्वाहभत्ता योजना इत्यादीसाठी पोर्टल सुरू ठेवलेले आहे. जे विद्यार्थी शासनाच्या नियमाप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता असणारी शिष्यवृत्ती/फ्रिशीप तसेच खुल्या प्रवर्गाकरिता असणारी सवलत ईबीसी / अल्पसंख्यांक किंवा अपंग शिष्यवृत्ती/इतर विविध निर्वाहभत्ता योजना २०२०-२१ करिता पात्र ठरत आहे त्यांनी त्वरीत आपला ऑनलाईन अर्ज भरून महाविद्यालयाकडे सादर करावा.

शासनाने ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दि. ३०/०९/२०२१ ही अंतिम मुदतवाढ जाहीर केलेली आहे. त्यामुळे या मुदतीतच विद्यार्थ्यांना वरील योजनेच्या लाभासाठी अर्ज करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

या मुदतीनंतर कोणत्याही विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार नाही, परिणामी त्यामुळे त्यास शासनाचे शिष्यवृत्ती/सवलत इत्यादीचे लाभ मिळणार नाहीत याची नोंद घ्यावी.

जर विद्यार्थ्यांने महाविद्यालयाकडून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, किंवा विकास निधी इत्यादीमध्ये सवलत घेतली आहे परंतु ऑनलाईन सादर केलेला नाही तर त्यास महाविद्यालयाचे वरील शुल्क भरणे बंधनकारक राहील.

ऑनलाईन सादर केलेला अर्ज कागदपत्रांअभावी त्यास त्रुटी दुरूस्तीकरिता / कागदपत्र अपलोड करण्याकरिता त्याचे महाडीबीटीच्या लॉगीनला पाठविला असल्यास ती दुरूस्ती करणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे अन्यथा त्याचेच लॉगीनला शिष्यवृत्ती/फ्रिशीप / ईबीसी इत्यादी सवलतीचा अर्ज राहिल्यास विद्यार्थी सदर योजनेसाठी अपात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

योजनांच्या माहितीसाठी महाविद्यालयाने यापूर्वी काढलेल्या नोटीसेस् व त्यामधील सूचना या विचारात घेऊन विद्यार्थ्यांनी आपला ऑनलाईन अर्ज भरावा.

वरील कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी सवलतीकरिता अपात्र ठरल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

B. R. A. C. TRUST ★ Vishwakarma Institute of Technology ★ विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७.

6/9/21
प्रबंधक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाचे संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द करणेसाठी.